ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

ijindex
digital directory of indian journals

ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)

# Excel's International Journal of Social Science & Humanities

An International Peer Reviewed Journal

January - 2020
Vol. I No. 13

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

EXCEL PUBLICATION HOUSE
AURANGABAD

आंबेडकरवादी मराठी साहित्य / स्वरुप आणि विविध प्रवाह-यांचा परामर्श
**डॉ. रामनाथ गंगाधर वाढे** 244
बाबुराव बागूलांची 'सूड' एक चांगली दीर्घकथा
**प्रा.डॉ. रंदिल गजेंद्र साहेबराव** 247
माज्या जल्माची चित्तरकथा : आंबेकरवादी आत्मकथन
**प्रा. दिवाकर विश्राम सदांशिव** 250
आंबेडकरी जलसे:आकलन आणि विश्लेषण
**प्रा. संध्या जंजाळ** 253
आंबेडकरी जाणीवेची कथालेखिका : उर्मिला पवार
**प्रा.म्हस्के सीताराम खंडू** 256
आंबेडकरी कवितेतून येणारे समतावादी विचार
**प्रा.डॉ.रामकिशन दहिफळे** 259
समकालीन आंबेडकरी कवयित्रींच्या काव्यातील स्त्री वेदना
**डॉ.ज्योती मुंकुदराव झाल्टे** 261
आंबेडकरवादी साहित्यातील भाषासौंदर्य अभ्यासाच्या दिशा
डॉ. विठ्ठल जंबाले 264
आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य दलित नव्हे आंबेडकरवादीच
**प्रा.डॉ.भास्कर वि. नरवाडे** 267
जातीय समीकरणातील साहित्य आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर
**प्रा.डॉ. रामदिनेवार गोविंद शंकरराव** 270
**आंबेडकरी चळवळीचे वैचारिक अधिष्ठान असलेली कविता : ऑडीट**
**प्रा. डॉ.संजय कसाब** 274
१९८० नंतरची आंबेडकरवादी कविता
**प्रा.डॉ. बाळासाहेब सोनवणे** 277
**आंबेडकरी कविता**
**डॉ. ललित अधाने** 279
अण्णाभाऊ साठे यांच्या कथेतील आंबेडकरवादी जाणिवा
**संशोधक बेटकर वैशाली चनबस** 283
आंबेडकरवादी मराठी कविता एक चिंतन
**प्रा.डॉ.लक्ष्मण एस.पवार** 286

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
DAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
Dist.Nanded

114-116

# आंबेडकरवादी साहित्यातील भाषासौंदर्य अभ्यासाच्या दिशा

DEGLOOR Dist.Nanded

डॉ. विठ्ठल जबाले

मराठी साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहामध्ये तळागाळातील माणसांच्या जगण्याचे प्रतिबिंब उमटू लागले. प्रस्थापित मराठी साहित्यमधील साचलेपणा नष्ट करून वास्तव जगणे अभिव्यक्त करण्यास प्रारंभ झाला. काल्पनिकतेला वास्तविकतेची जोड देण्यात आली. स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठी साहित्य नवनवीन वाटा आणि वळणे घेऊन साहित्यप्रवाहाच्या निर्मितीस अनुकूल वातावरण तयार झाले. खेडयातील, वनातील, मागासवस्तीतील अथवा आधुनिकीकरणापासून कोसो दूर असलेला माणूस अस्सल जगण्यासह साहित्यामधून चित्रित करण्यात येऊ लागला. त्याची समाज, संस्कृती, साहित्य आणि भाषा जीवनमूल्ये आणि कला / साहित्यमूल्यासह साहित्याचा अविभाज्य भाग बनला. त्यामधून नवमूल्यांची प्रस्थापना झाली आणि साठोत्तरी वाङ्मयनिर्मितीचे प्रवाह उदयास आले. रूढ झाले. शोषित, पिडित, वंचित, उपेक्षित जगणे मुखर करणारी भाषा साहित्याचे माध्यम म्हणून योजली. त्यामुळे मराठी साहित्यामध्ये भाषेची निराळी मुद्रा तयार झाली आहे. वाङ्मयीन क्षेत्रामध्ये मराठी भाषेचे वेगळपण सिद्ध झाले. दलित साहित्याची उगम पावलेली साहित्यसरिता विविध प्रकारांमधून प्रवाहरूप धारण केल्यामुळे मराठी साहित्याचा विस्तार वाढलेला आहे. सामान्य माणसांच्या जगण्याचे विविध स्तर अधोरेखित करणारे साहित्य मराठी सारस्वतामध्ये साठोत्तरी वाङ्मयीन साहित्य प्रवाहामध्ये दलित साहित्य म्हणून ओळखले जाते.

साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहांमध्ये दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, जनवादी साहित्य, आदिवासी साहित्य हे साहित्यप्रवाह जोरकसपणे निर्माण झाले, विस्तारले. त्यामुळे मराठी साहित्याची कक्षा वृद्धिंगत झाली. यामध्ये दलित साहित्य प्रवाहाने विशिष्ट अशी साहित्यविषयक चौकट मोडित काढली. नवीन मूल्यांची प्रस्थापना केली.

समकालीन मराठी साहित्याची चर्चा करीत असताना घ्दलित साहित्यङ किंवा घ्आंबेडकरी प्रेरणेचे साहित्यङ हा घटक महत्त्वाचा आहे, स्वाभाविक आहे, अपरिहार्य आहे. कारण आपल्याकडे फुले- शाहू- आंबेडकरांच्या विचारसरणीचा समृद्ध वारसा आहे. आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य त्या त्या प्रदेशातील साहित्याचे केंद्र बनले आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही प्रेरणा साहित्यामधूनच सर्वत्र रूजलेली आहे, पोहचलेली आहे. घ्दलितांच्या वाटयाला आलेले विदारक व जळजळीत अनुभवविश्व प्रथमच मराठी वाचकापुढे उलगडले गेले. नवी शब्दकळाही हाती आली. ङ (पृ. ४७) आधुनिकीकरण - खजगीकरण - उदारीकरण आणि औद्योगीकरणाच्या रेटयामध्ये जागतिकीकरणाच्या काळात मराठी भाषा आणि साहित्यामध्ये सर्वांग बदल होत आहेत. मराठी भाषेमध्ये समृद्धीसाठी वाङ्मयीन प्रवाहाचे योगदान मोलाचे ठरले आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये आंबेडकरवादी साहित्यातील भाषासौंदर्य ही बाब केंद्रस्थानी आहे. शोषित, पिडित, वंचित समाजातील उपेक्षा, वेदना, विद्रोह, दुःख, दैन्य, दारिद्र्य चित्रणामधून दलित साहित्याची निर्मिती झाली. साठोत्तरी काळामध्ये दलित साहित्य म्हणून संबोधण्यात आलेला वाङ्मयीन प्रवाह अलिकडे आंबेडकरवादी साहित्य या नावाने ओळख

निर्माण करीत आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार दलित हा शब्द आक्षेपार्ह आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने निर्माण झालेले साहित्य आंबेडकरवादी साहित्य मानण्यात येत आहे. या साहित्यामध्ये कथा, कादंबरी, कविता, नाटक, जलसा, प्रवासवर्णन, आत्मकथन, वैचारिकलेखन, ललितलेखन इ. वाङ्मय प्रकार पिढीजात भाषा, संस्कृती, समाजवास्तवासह निर्माण झाले आणि होत आहेत. या साहित्याने मराठी साहित्या नवदिशा, नव्यावाटा आणि वळणे प्राप्त करून दिलेले आहेत. नवी मुद्रा प्राप्त झालेली आहे. त्याचे मुख्य बलस्थान भाषा, बोली, बोलभाषा, सामान्य जनांची नित्य व्यवहारभाषा हेच आहे. या भाषचे सौदर्य अभ्यासण्याचा दृष्टिकोन विकसित करणे महत्त्वाचे आहे.

आंबेडकरवादी साहित्यामधील भाषासौदर्य वाढविणारे घटक : २१व्या शतकातील आंबेडकरवादी साहित्यामधील भाषिक उपयोजन अभ्यासताना मराठी साहित्यामध्ये भाषासौदर्य वृद्धिंगत करण्यासाठी आंबेडकरवादी साहित्याने मौलिक भर घातलेली आहे. शोषित, वंचित, आधुनिकीकरणापासून कोसो दूर असलेला समाज आणि त्यांचे जगणे मागासलेपणातील मूळ बाबींसह अस्सल मराठी भाषा आणि साहित्यामध्ये गडदपणे अधोरेखित केले जाऊ लागले, तेव्हा त्या साहित्याची भाषा शोषित-पिडितांच्या नित्यव्यवहाराची भाषा होती. त्या भाषेमधून दीन - दलितांच्या ओठावरील भिजभाषा, बोलभाषा, व्यवहारभाषा हीच साहित्याची भाषा योजली.

आंबेडकरवादी साहित्यातील भाषासौदर्य कथा, कादंबरी, कविता, नाटक, आत्मकथन, प्रवासवर्णन इ. वाङ्मयप्रकारांमधून ठळकपणे अभ्यासता येते. लेखकगत भाषाशैली, वाङ्मयप्रकारनुसार भाषाशैली, परिसरनिष्ठ भाषा, प्रदेश, कार्यक्षेत्र, लिंगनिहाय, वयानुसार, आणि व्यवसायानुसार भाषिक निराळेपण लक्षवेधी असते. याचा मागोवा घेत असताना त्या साहित्यकृतीमधील शब्दकळा, शब्दांच्या प्रवृत्ती, शब्दांचे प्रकार, प्रयोगविचार, विभक्तिविचार, आख्यातप्रक्रिया, शब्दांची रुपे, हेल, लकबी, ढब, लहेजा, रंग-ढंग- तरंग, व्यकरणिक प्रक्रिया, प्रत्ययप्रक्रिया, उच्चार प्रक्रिया, ऐतिहासिक, सांस्कृतिक संदर्भमूलकता, इतर भाषेच्या प्रभावातून बनलेली भाषिक रूपे, म्हणी, वाक्प्रचार, उपमा, प्रतिमा, प्रतीके, रूपक, संवादामधील वेगळेपणा इत्यादी बाबींना मध्यवर्ती ठेवून आंबेडकरवादी साहित्याची भाषिक मीमांसा करणे शक्य आहे. करिता पुढील मुदयांआधारे साहित्यामधील भाषेचा शोध घेता येतो.

वेदना-विद्रोह-नकार या त्रिसूत्रीमधून योजलेली भाषा : आंबेडकरवादी वाङ्मयाने मराठी वाङ्मयामध्ये या त्रिसूत्रींना अनुसरून भाषेची देणगी दिली. सामान्य माणसांचे दुःख अभिव्यक्त करण्यासाठी क्रांतिकारी भाषेचा आधार घेतला. तसेच प्रस्थापित मराठी साहित्यातील संकेतांना नाकारून साहित्य सर्जन घडविले. उपेक्षितांच्या दुःखाला उजागर केले. पु.ल. देशपांडे म्हणतात, त्याप्रमाणें घ्दलित वाङ्मयाने मराठी साहित्यामध्ये प्रथम जर काही आणले असेल तर संतापातून चकाकणारे अश्रू. अन्यायाविरूद्ध उठताना संतापातून फुटणाज्या अश्रूंचे मोल हे सर्वात मोठे असते सामान्यांच्या भाषेत हा तळतळाट असतो. ह्याच तळतळाटाचे एक उदात्त स्वरूप म्हणजे दलि साहित्य.ङ यारून दलित साहित्य हा उपेक्षितांचा दुःखाचा त्यांच्याच भाषेमध्ये घडलेला हुंकार आहे

त्या साहित्याचे माध्यम म्हणून योजलेली भाषा जगण्यातील अस्सल आरसा आहे.

त्याभाषेमधून मानवमुक्तीच्या उद्घोष प्रकट होतो. संविधानमूल्यांना अव्हेरणारी भाषा या साहित्याचे केंद्रवर्ती सूत्र आहे. सनातन प्रवृत्तींचा निषेध कथन करणारी भाषा या साहित्याचा प्राण आहे. जागतिकीकरणानंतरची साहित्यातील भाषा पर्यायाने या साहित्यामध्ये आलेली आहे. या साहित्यामध्ये समकालीन घडामोडींचे भाषिक पडसाद उमटलेले आहेत. समाजकारण, शिक्षण, सत्ताकारण यांच्या प्रभावातून बदलती भाषासंकल्पना या साहित्यामधून सहजता प्रतिबिंबित झालेली आहे.

हल्लीच्या लेखनातील भाषामिश्रण, बोल, हेल, लकब, ढब इत्यादी समाजभाषेमुळे मराठी भाषेची समृद्धता वाढत आहे. याकरिता आंबेडकरवादी साहित्यिकांचे योगदान मौलिक स्वरूपाचे आहे. पारंपरिक भाषासौष्ठव जतन करीत मराठी साहित्यामध्ये अर्थविस्तार आणि अर्थ प्रशस्तीकरणासाठी लेखकांनी अभिव्यक्त झाले पाहिजे. या अभिव्यक्तीमध्ये जीवनाशी प्रामाणिक निष्ठा ठेवून जोरकस मूळ जगणे साहित्यामधून अधोरेखित झाले पाहिजे. त्याकरिता उपजत भाषेचा वापर करावा. संशोधकांना त्याचा शोध घेतला पाहिजे. आंबेडकरवादी साहित्यामध्ये स्वकथने, कथा, कादंबरी इ. वाङ्मयप्रकारनिहाय भाषेचे बदलते स्वरूप आढळते. आज जगात अनेक भाषा आणि बोली नष्ट होत आहेत. मृतप्राय ठरत आहेत. जागतिक परिक्षेत्रामध्ये आंबेडकरवादी साहित्याने जतन आणि संवर्धन केलेल्या मराठी भाषेचे आणि साहित्य अवलोकन करणे महत्त्वाचे आहे. राष्ट्रीयतेच्या कक्षांना स्पर्श करणाऱ्या बोली आणि प्रादेशिकतेच्या संकेतांना तिलांजली देणारी भाषा दलित आत्मकथने व कथात्म साहित्यामधून आलेली आहे. प्रदेशाच्य परिसीमा ओलांडणारे भाषासंचित उलगडणे अभ्यासकांसाठी महत्त्वाचे आहे. आंबेडकरवादी साहित्यिकांनी सामाजिक उत्क्रांतीचा संदेश देणारी भाषा, शोषित- पिडित-वंचित यांना जगण्याचे बळ देणारे भाषाउपयोजन, पिडितांच्या दुःखावर फुंकर घालणारी भाषा, नवनिर्मिती-साहित्य सर्जनासाठी केंद्रवर्ती भाषा हेतूपुरस्परपणे उपयोजन केलेली आहे. अभ्यासकांना तो खजिना सापडेल. त्यातून मराठी भाषा संवर्धनास मदत होईल. मायबोली मराठी भाषेच्या ऋणामधून उतराई झाल्याचा आनंद मिळेल.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

**डॉ. विठ्ठल जंबाले**
प्रमुख, पदवी आणि पद्व्युत्तर मराठी विभाग, देगलूर महाविद्यालय देगलूर.